सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री. संजय ना. नाकटे, लेखाधिकारी.

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-२०२५/प्र.क्र.४९/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०२.०६.२०२५.

**संदर्भ**:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/श्री.नाकटे/११.२४/०६/००९/६६/४९०२, दि.०६.०१.२०२५

२) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.२२/कोषा प्रशा-२, दि.१३.०२.२०२४,

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचे जा.क्र. रजिप/शिक्षण/सशि/व.स./३१७/२०२४, दि.०७.०६.२०२४,

४) उपसंचालक (प्रशासन), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्री.नाकटे/प्रतिक्षाधीन/१०-२०२४/६७६, दि.२२.१०.२०२४,

५) प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांचे आदेश क्र.बाहआ/२०२४/८०३/दि.२०.०६.२०२४,

६) उपसंचालक (प्रशासन), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्री.नाकटे/प्रतिक्षाधीन/१०-२०२४/६७७, दि.२२.१०.२०२४,

७) अवर सचिव तथा प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांचे आदेश क्र.बाहआ/२०२४-२५/१२०३/दि.०९.०८.२०२४,

८) संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/रजा/१०.२४/०१, दि.०२.०१.२०२५,

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
03 JUN 2025
प्राप्त झाले सही.......

00243/2025/1015
04-06-25

**-: <u>शासन आदेश</u> :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकरी संवर्गातील श्री. संजय नाना नाकटे यांना संदर्भ क्र.२, शासन दि.१३.०२.२०२४ च्या आदेशान्वये लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई या पदावर पदस्थापना देण्यात आली.

२. श्री. नाकटे यांना पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी लेखा अधिकारी, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, रत्नागिरी या पदावरुन संदर्भ क्र.३, अन्वये दि.०७.०६.२०२४ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

३. श्री.नाकटे हे ०७ दिवसांची अर्जित रजा उपभोगून दि.१४.०६.२०२४ रोजी पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी गेले असता त्यांना दि.०१.०७.२०२४ रोजी हजर करुन घेतले जाईल असे दि.१८.०२.२०२४ रोजी मौखिकरित्या सांगण्यात आले. त्यामुळे शासन परिपत्रक २०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्री. नाकटे हे संदर्भ क्र.४ अन्वये दि.१९.०६.२०२४ (म.पू.) रोजी लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई येथे प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून रुजू झाले.

४. महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई येथे लेखा अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती लाडे यांना दि.०१.०७.२०२४ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात येत असून श्री. नाकटे, लेखा अधिकारी यांना पदस्थापनेच्या पदावर हजर करुन घेण्यात येत असल्याचे संदर्भ क्र.५ रोजीच्या पत्रान्वये लेखा व कोषागारे संचालनालय यांना कळविण्यात आले.

५. संदर्भ क्र.६ अन्वये श्री. नाकटे यांना लेखा अधिकारी, महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई या पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी लेखा व कोषागारे संचालनालयाकडून दि.०८.०८.२०२४ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. सदर पदस्थापनेच्या पदावर श्री. नाकटे हे संदर्भ क्र.७ अन्वये दि.०९.०८.२०२४ (म.पू.) रोजी रुजू झालेले आहेत.

६. श्री. नाकटे, लेखा अधिकारी यांनी दि.०७.०६.२०२४ ते दि.१८.०६.२०२४ या कालावधीत १२ दिवस अर्जित रजा उपभोगलेली असून सदर रजा संचालनालयाने संदर्भ क्र.८ , दि.०२.०१.२०२५ अन्वये मंजूर केली आहे.

७. श्री.नाकटे, लेखा अधिकारी यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.१९.०६.२०२४ ते दि.०८.०८.२०२४ | ५१ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत. संचालनालय लेखा व कोषागारे,मुंबई येथे कार्यरत. |
| | **एकुण** | **५१ दिवस** | |

८. यास्तव, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) मधील तरतूदींच्या अधीन राहून लेखाधिकारी संवर्गातील श्री.संजय नाना नाकटे यांच्या दि.१९.०६.२०२४ ते दि.०८.०८.२०२४ पर्यंत ५१ दिवस नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता आहरण व संवितरण अधिकारी तथा लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता.र.पवार)**
**अवर सचिव, वित्त विभाग.**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) आंहरण व संवितरण अधिकारी तथा लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग,मुंबई,*
६) श्री. संजय नाना नाकटे, लेखाधिकारी *
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)